क्र.का.4/प्र.क्र.3047/2000/831-880
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय, पुणे 1
दिनांक 18/02/2003

**विषय -** दस्तासोबत मुखत्यारपत्राची प्रत जोडणेबाबत.
**संदर्भ** - या कार्यालयांचे परिपत्रक क्र:का4/प्र.क्र.3047/2002/2253-3042, दि.12/07/2002.

**परिपत्रक:-**

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन परिपत्रकाचे अनुषंगाने खाली नमुद केल्याप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

अ) मुखत्यारपत्राचा दस्त जर नोंदणी कायद्यान्वये रितसर नोंदणी केलेला असेल व त्यावर अधिकार देणा-याचे व घेणा-याचे फोटो व अंगठयाचे ठसे आलेले असतील तर अशा मुखत्यारपत्राचा नोंदणी क्रमांक व दिनांक यांचा पुढील दस्तामध्ये (म्हणजे विक्री करारनामा, खरेदीखत, इ हस्तांतरणाचे दस्त) केल्यास मुखत्यारपत्राची प्रत दस्तांसोबत जोडण्याची आवश्यकता राहणार नाही.

ब) पुढील प्रत्येक दस्तऐवजाच्या नोंदणीच्या वेळी दुय्यम निंबधक यांनी दस्तामध्ये नमुद केलेल्या मुखत्यारपत्राची मुळ प्रत पाहून खात्री करावी.

याविषयी पुर्वी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले असल्याने सदरच्या सुचना पुन्हा देण्यात येत आहेत. तरी सह जिल्हा निंबधक यांनी उपरोक्त सुचना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व दुय्यम निंबधक यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांच्या सहीचे असे.**

(सही/- व.मा.मसके)
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता..**

प्रती-

1. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
2. सर्व सह जिल्हा निंबधक
3. दुय्यम निंबधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई/ बांद्रा.

4. सर्व दुय्यम निंबधक (सह जिल्हा निंबधक यांच्यामार्फत)